# लाखारा फाट्याजवळ झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू

## सात जण गंभीर ■ पिकअप वाहन व आयसर ट्रक एकमेकांवर धडकले





परसराम मनसाराम धुर्वे



राजेश रमेश यूवनाते

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.28 )** – संत्र्यांने भरुन आयसर ट्रक मोर्शीकडे जात असताना समोरुन येणाऱ्या पिकअप वाहनाची समोरासमोर धडक लागल्याने भीषण अपघात घडला. बुधवारी(दि.27) रात्री 9 वाजता लाखारा फाटयाजवळ झालेल्या या अपघातामध्ये चार जणांचा घटनास्थळी मृत्यू झाला. तर यामध्ये सात जण गंभीर जखमी झाले. यातील जखमींना वरुड व नागपूर येथे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस सुत्रानुसार, राजेश रमेश युवनाते (वय 20), परसराम मंसाराम धुर्वे (वय 34 दोघेही रा.पांढरघाटी) तर तैकीक शहा रफिक शहा (वय 32), मो. नासीर मो. साबीर (वय 40 दोघेही राहणार अचलपूर) असे मृतकांचे नाव आहे. तर मो. निसार मो. मतीन (वय 39), मो. कैसर अ. मतीन(वय 45), मो. मजारीद मो. साबीर (वय 33), अ. अरशद अ. जमील (वय 30), सैय्यद सोहेल सैय्याद शकील (वय 22), शेख रहीम शेख उस्मान (वय 40), दानिश मो. अकरम (वय 26) असे जखमीचे नाव आहे.

बुधवारी सायंकाळी 9 वाजताच्या दरम्यान वरुड येथून संत्र्यांने भरून जात असलेल्या एमएच 38/ एक्स 30 75 क्रमांकाच्या आयसर ट्रकला लाखारा फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एमएच 27/ बी एक्स 9271 क्रमांकाच्या पिकअप वाहनाची जोरदार धडक बसली. त्या धडकेमध्ये पिकअप मधील दोघे व आयसर मधील दोघे असे चार जण जागीच ठार झाले. या घटनेची माहिती ये-जा करणाऱ्या नागरिकांनी पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन आयसर मधील जखमींना वरुड येथील खाजगी दवाखान्यात व नागपूर येथे दाखल करण्यात आले. आयसर मध्ये एकून नऊ जण असल्याची माहिती आहे त्यापैकी दोघेजण ठार झाले असून पिकअप मधील दोघेही असे एकूण चार जण जागीच ठार झाले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदना करीता वरुडच्या ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. दुपारी चार वाजेपर्यंत मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांकडे स्वाधीन करण्यात आला. मृतदेहावर पांढरघाटी व अचलपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आल्याची माहिती आहे. घटनेचा पुढील तपास बेनोडा शहिदचे ठाणेदार ज्ञानोबा फड यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहे.

### लाखारा फाट्यावर होतात अनेक अपघात

वरुड ते अमरावती हा राष्ट्रीय महामार्ग असून वरुड येथून 16 किलोमीटर अंतरावर असलेल्या लाखारा फाटा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होत असतात अनेक जण या ठिकाणी मृत्युमुखी पडल्याचे बोलल्या जात आहे , या ठिकाणी वळण रस्ता असल्यामुळे समोरून येणारे वाहन हे दृष्टीस पडत नसल्यामुळे चालक हा सरळ वाहन घेऊन जातो, त्यामुळे येणारे पुढचे वाहन थेट वाहनावर येऊन अपघात होण्याचे कारण आहे. अशातलाच एक प्रकार हा रात्रीच्या सुमारास आयसर व पिकअपमध्ये घडला असावा आणि त्यातूनच अपघात झाला असल्याची चर्चा घटनास्थळावर आहे. तरी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन या ठिकाणी अपघात होणार नाही याकरिता उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# मुंडके नसलेले धड आढळले

■म्हाडा कॉलनीजवळील मोकळ्या जागेत सापडला मृतदेह

■अनोळखी मृताची ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान



### मृतक ग्रामिण भागातील असल्याचा अंदाज

पोलिसांनी मृताच्या वेषभुषेची पाहणी केली असता, तो व्यक्ती ग्रामिण भागातील असल्याचे दिसून आले आहे. त्याच्या कपड्यात एक तंबाखुची पुडी आढळून आली असून, ती पुडी अचलपूर परिसरातील असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे मृतक हा ग्रामिण परिसरातील असल्याचे पोलिस चौकशीत पुढे आले आहे.

घटनास्थळी मुंडके नसलेला मृतदेह आढळून आला आहे. त्यामुळे मृतक व्यक्तीची ओळख पटलेली नाही. मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मृतक व्यक्ती हा 45 ते 50 वयोगटातील आहे. आरोपींनी पुरावा लपविण्यासाठी हे कृत्य केले असावे. मृतक ग्रामिण भागातील असल्याचे त्याच्या वस्तु व कपड्यावरून दिसून येते.

**गणेश शिंदे,**
**पोलिस उपायुक्त.**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील म्हाडा कॉलनीजवळील मोकळ्या जागेत मुंडके नसलेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. मुंडके नसल्याने मृतकाची ओळख पटविणे कठीण झाले आहे. त्यामुळे अनोळखी मृतक व्यक्तीची ओळख पटविण्याचे आव्हान अमरावती पोलिसांसमोर निर्माण झाले आहे. मृतक हा 45 ते 50 वयोगटातील असल्याचा अंदाज आहे. आरोपीने हत्या करून मुंडके छाटले आणि ते धडापासून वेगळे केले आहे. मृताची ओळख पटू नये, यासाठी हे कृत्य केले असावे, असा पोलिसांनी कयास लावला आहे.

अकोली रोडवरील म्हाडा कॉलनी परिसरातील स्मशानाजवळ शालिकराम यादव यांच्या वाडी शेजारी असणाऱ्या मोकळ्या जागेतील झाडाझुडुपात 28 नोव्हेबर रोजी सकाळी मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती काही नागरिकांनी डायल 112 वर पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता, तेथे मुंडके नसलेले एका इसमाचा मृतदेह असल्याचे दिसून आले. या घटनेच्या माहितीवरून फॉरेन्सिक लॅब, डॉग स्कॉड, फिंगरप्रिन्ट एक्सपर्ट, खोलापुरी गेट पोलिस घटनास्थळी दाखल झाले. खोलापुरी गेट पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असता, घटनास्थळी रक्ताने माखलेला एक सतूर दिसून आला.

पोलिसांनी तो जप्त केला. दरम्यान मृतकाची एक चप्पल घटनास्थळी, तर दुसरी लांब अंतरावर दिसून आली. मृतकाचे शरीरापासून मुंडके गायब असल्याचे आढळून आले. त्यामुळे मृतक कोण आहे, याचा अद्याप शोध लागू शकला नाही. त्यामुळे मारेकरी कोण आहे, ही बाब पुढे आली नाही.

याप्रकरणात खोलापुरी गेट पोलिसांनी चौकशी सुरु केली असून, रात्री उशिरापर्यंत मृताची ओळख पटली नव्हती. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली होती.

# एकलविर येथील वृद्धावर अस्वलाचा हल्ला



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.28 )** – तालुक्या अंतर्गत येत असलेल्या एकलविहीर येथील एका वृद्धावर अस्वलाने हल्ला करून जखमी केल्याची घटना गुरुवार दि.28 ला दुपारी 2 वाजताच्या दरम्यान घडली सुदैवाने जीवित हानी झाली नाही, अन्यथा त्या वृद्धाला जीवाला मुकावे लागले असते.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीराम सिंधराम (रा.एकल विहीर) असे अस्वलाने जखमी केलेल्या वृद्धाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी 2 वाजताच्या सुमारास जखमी श्रीराम हा शेतामध्ये काही कामानिमित्त गेले. अचानक श्रीराम यांच्यावर अस्वलाने हल्ला केला, यावेळी श्रीराम याने आरडओरड केल्यानंतर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी श्रीराम यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी अस्वलीला धुडकावण्याचा प्रयत्न केल्यानंतर अस्वलीने तेथून पोबारा केला. जखमी अवस्थेत असलेल्या श्रीराम याला तातडीने सुरुवातीला पुसला येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दाखल केले. श्रीराम यांना पत्नी व मुले असून सर्वच मोलमजुरी करून आपली उपजीविका भागवितात, परंतु वन्यप्राण्यामुळे कुटुंबातील व्यक्तीवर अशा प्रकारचे हल्ले होत असेल तर याला जबाबदार कोण असा प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी वन विभागाने घेऊन जंगलाकाठी जमिनी असणाऱ्या शेतकऱ्यांना संरक्षण म्हणून काही उपाययोजना करण्यात याव्या, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# बेपत्ता व्यक्तीचा चुडामन नदीच्या काठावर आढळला मृतदेह

## घातपाताची शक्यता, पोलिसात मिसिंगची तक्रार दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.28 )**– शहरातील नगरपरिषद मोक्षधाम परिसरातील चुडामन नदीच्या काठावर नाना पेठे यांचा मृतदेह आढळून आल्याने विविध चर्चांना पेव फुटले आहे. नाना पेठेंची आत्महत्या की घातपात अशी चर्चा आहे. याप्रकरणी वरूड पोलिसांनी आकस्मिक मूर्तीची नोंद केली असून घटनेचा पुढील तपास वरुड पोलीस करीत आहे.

प्राप्त माहितीनुसार पार्डी बोरांग परिसरात आपल्या आई-वडील भाऊ पत्नी व मुलीसह वास्तव्यास असलेला नाना पेठ हे शहरातील एका कापड दुकानात कामावर होते. गेल्या तीन महिन्यापासून त्याला मोठ्या प्रमाणात दारूचे व्यसन जडल्याने कुटुंबीयांना त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होता. त्यामुळे प्रथम त्याची आई वडील व लहान भाऊ हे दुसरीकडे राहू लागले होते. नंतर मृतक नाना हा पत्नी व मुलीसह राहत असताना पत्नीला सुद्धा मारहाण करीत असल्याने पत्नी सुद्धा काही दिवसापूर्वी शहरातील शनिवार पेठ येथे तिचे वडील नामदेवराव कुंभारे यांच्याकडे जाऊन राहत होती, अशातच नाना 24 नोव्हेंबरला रात्री सासऱ्याकडे गेले, तेथे जेवण केल्यानंतर तो बाहेर गेले, मात्र तो घरी पोहोचलाच नव्हता.

त्यामुळे ते बेपत्ता असल्याची तक्रार कुटुंबीयांनी पोलिसात देऊन त्याचा सर्वत्र शोध घेणे सुरू केले होते. अशातच 26 नोव्हेंबरला सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास शहराच्या नगरपरिषद मोक्षधाम परिसरातील चुडामन नदीच्या काठावर त्याचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ माजली होती. घटनेची माहिती पोलिसांना मिळतात पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून त्याचा मृतदेह शवविच्छेदनाकरिता वरुड ग्रामीण रुग्णालयात रवाना केला दि.27 ला सकाळच्या सुमारास त्याचे शवविच्छेदन झाल्यानंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र नाना यांनी आत्महत्या केली की त्याचा घातपात झाला किंवा दारूच्या नशेत तो नदीकाठी पडून त्यांचा थंडीने मृत्यू झाला. याबाबत कुठलीही माहिती मिळू शकली नसून घटनेचा पुढील तपास ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलीस करीत आहे.

# उकळते दूध पडून भाजल्याने 8 वर्षीय बालकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )**– अंगावर गरम दूध पडल्याने भाजून आठ वर्षीय बालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीत बोथरा नर्सरी येथे घडली. मृतक बालकाचे नाव संजय दादू मावसकर (वय 8) असे आहे.माहितीनुसार, दादू कारमा मावसकर (वय 40, रा. बोथरा नर्सरी) हे कुल्फी बनवण्याकरिता दुधाचे गंजात दूध उकळत होते. यादरम्यान देते त्यांची मुले अनिस आणि संजय हे दोघेही पत्नी सोबत खेळत होते. खेळताना मुलांच्या अंगावर गरम दूध सांडले. यामध्ये मुलगा संजय खूप जळाला तसेच अनेश च्या पायावर दूध सांडल्याने तो देखील भाजला. दोघांनाही पीडीएमसी रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले होते. संजय याला दवाखान्यात भरती गेले होते. मात्र अत्याधिक भाजल्याने उपचारादरम्यान 27 नोव्हेंबर रोजी त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# घरात घुसून चाकूच्या धाकावर 1.20 लाखाने लुटले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कलोती नगर स्थित सराफा ले-आऊटमधील एका घरात चोरांनी घुसून चाकूचा धाक दाखवित एका महिलेला लुटले. या चोरीत घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एक लाख वीस हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. ही घटना 28 नोव्हेंबर रोजी पहाटे घडली. महिलेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कलोती नगर संकुलातील सराफा लेआउटमध्ये राहणारी महिला 27 नोव्हेंबर रोजी नेहमीप्रमाणे रात्री आपल्या घरात झोपल्या होत्या. दरम्यान रात्री अडीचच्या सुमारास घरात कोणीतरी असल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यांना जाग आली असता, त्यांच्या समोर काळे कपडे आणि जॅकेट घातलेला एक तरुण होता. महिलेने तात्काळ आईला उठवण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने महिलेला चाकूचा धाक दाखवून गप्प बसण्यास सांगितले. त्यानंतर चोराने घरातून 10 ग्रॅम सोन्याची साखळी, हातातील पाच अंगठ्या, कपाटात ठेवलेले 10 ग्रॅम सोन्याचे कर्णफुले, 1 ग्रॅम सोन्याची नथ रिंग, 3 ग्रॅम ठुसी, चांदीचे पायल, असे एकूण 29 ग्रॅमचे दागिने असा एक लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. महिलेच्या गळ्यातील 20 हजार रुपये आणि हॉलमध्ये ठेवलेल्या पर्समधून 5 हजार रुपये असा एकूण 1 लाख 26 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. पहाटे घडलेल्या या घटनेने महिला चांगलीच घाबरली होती. महिलेने फ्रेजरपुरा पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिस पथकाने महिलेच्या घरी जाऊन पंचनामा केला. पोलीस आवारातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासत आहेत. महिलेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# बच्चू कडू याचे राणा दाम्पत्यास आव्हान

## म्हणाले, 'पुन्हा निवडणूक घ्या..'



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – राज्यात नुकतीच विधानसभेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत महायुतीशी थेट लढत असलेल्या महाविकास आघाडीचा धक्कादायक पराभव झाला. तर तिसरी आघाडी उघडलेल्या प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनाही पराभवाचा धक्का बसला. अचलपूर विधानसभा मतदारसंघातून बच्चू कडू यांचा पराभव झाला. दरम्यान, पराभवानंतर एकनाथ शिंदे यांचा फोन आला होता, त्यांनी विचारपूस केली, असे बच्चू कडू यांनी सांगितले. एकनाथ शिंदे यांनी माझ्याशी संपर्क केला आणि निवडणुकीबाबत माहिती घेतली, असे बच्चू कडू म्हणाले. तसेच, विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मला खूप कॉल आले, त्यामुळे आम्ही जनतेकडून अभिप्राय घेऊन आम्ही लोकांसमोर जाणार आहोत. गेल्या 20 वर्षात लाखांपेक्षा अधिक लोकांच्या आम्ही शस्त्रक्रिया केल्या आहेत, कामात आम्ही महाराष्ट्रात अव्वल आहोत. पण, मुस्लिमांचा फतवा आणि कटेंगे तो बटेंगे, यामुळे आमचा सेवेचा झेंडा हरला आहे, अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी दिली. दरम्यान, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाल्याने अमरावती जिल्ह्यातील राणा आणि कडू यांच्यातील वाद पुन्हा उफाळून आला आहे. राणा दाम्पत्याने बच्चू कडूंना पाडण्यासाठी काम केल्याने बच्चू कडू यांचा पराभव झाल्याचे बोलले जात आहे. मात्र, माझ्या पराभवाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न राणांनी करू नये, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. मला पाडण्याची राणांची लायकी नाही, अशी घणाघाती टीका बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्यांवर केली. माझा पराभव त्यांनी करावा, एवढी राणा दाम्पत्याची औकाद नाही, असे म्हणत कोणताही मतदारसंघ निवडा तुम्ही बिगर पार्टीचे आणि मी बिगर पार्टीचा, असे थेट आव्हान बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्याला दिले. तसेच, व्हीएमच्या जागी बॅलेट पेपरवर निवडणूक घ्या आणि आजमावून घ्या. खरे मर्द असाल तर पुन्हा निवडणूक घ्या, आत्ताच सांगावं राणांनी पाच वर्षे कशासाठी थांबता, अशा शब्दांत बच्चू कडू यांनी रवी राणा यांच्यावर निशाणा साधत आव्हान दिले आहे.

### बच्चू हटाव हा नारा लोकांनीच दिला - रवी राणा

आम्हाला श्रेय घेण्याची गरज नाही, लोकांनी त्यांना हटवलं आहे. बच्चू हटाव हा नारा लोकांनीच दिला, असे म्हणत रवी राणा यांनी बच्चू कडूंवर हल्लाबोल केला. बच्चू कडू म्हणाले होते की, मुख्यमंत्री होईन पण त्यांनी आता बोलणे बंद करायला हवं. पाच वर्षानंतर मी बच्चू कडू यांचे आव्हान स्वीकारेन, ते सांगतील तिथे मी उभा राहीन, असे सांगत बच्चू कडू यांचे आव्हान रवी राणा यांनी स्वीकारले आहे.

# लोखंडी प्लेट चोरी करणारे जेरबंद

## ■ चोरटे वरुड पोलीसांच्या जाळयात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – लोखंडी प्लेट चोरी प्रकरणातील दोन आरोपींना अटक करण्यात मोर्शी पोलिसांना 27 नोव्हेबर यश मिळाले. कुलदिपसिंग दर्शनसिंग जुनी (29, रा. प्लॉट नं.06, बीडगाव नागपुर) व युवराज लालचंद ठाकरे (32, रा. पोवारी नगर) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींच्या ताब्यातून लोखंडी प्लेटचे तुकडे असा अंदाजे 5 लाख 12 हजाराचा माल व लोखंडी प्लेट चोरी करण्याकरीता वापरलेले मालवाहु वाहन असा एकुण 15 लाख 12 हजार रुपयांचा माल जप्त केला.

न्यायालयाने आरोपीला पोलिस कोठडी सुनावली असून, आरोपींकडून चार गुन्हे उघडकीस आले आहे. आरोपींकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वरुड पोलीसांनी वर्तविली आहे. 27 ऑक्टोबर रोजी रात्रीदरम्यान वरुड हद्दीतील मोरचुंद ते चिंचरगव्हाण रोडवरील बंधाऱ्यातील पाणी अडविण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या 61 लोखंडी प्लेटा (किंमत 2 लाख 90 हजार) चोरी गेल्या होत्या. या घटनेच्या तक्रारीवरून वरुड पोलिस ठाण्यात अज्ञात चोराविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. याप्रकरणात ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनात बीट अधिकारी पोलिस उपनिरीक्षक दिपक दळवी, अंमलदार पोलिस हवालदार विनोद पवार, राम बदने यांनी तपास सुरु केला. त्यांनी गुन्ह्याचा तांत्रिक तपास करुन व गोपनिय माहीती घेवुन आरोपींना नागपुराचून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, त्यांनी वरुड व मोर्शी गुन्हे केल्याची कबुली दिली.

या माहितीवरून पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून 29 लोखंडी प्लेट व 230 मोडतोड केलेल्या लोखंडी प्लेटचे तुकडे असा अंदाजे 5 लाख 12 हजाराचा माल व लोखंडी प्लेट चोरी करण्याकरीता वापरलेले मालवाहु वाहन क्र.एमएच 40-बीएल-1784 असा एकुण 15 लाख 12 हजाराचा माल जप्त केला.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अचलपूर मतदारसंघाकरिता राज्यमंत्रिपद अभिशाप?

## माजी मंत्री वसुधा देशमुख, विनायक कोरडेंप्रमाणे बच्चू कडूंनीही गमावली आमदारकी



**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.28 ) –** अचलपूर मतदारसंघाच्या निवडणुकीत माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या पराभवाने एक बाब अधोरेखित झाली. ती म्हणजे, अचलपूर मतदारसंघाकरिता राज्यमंत्रिपद अभिशाप ठरत असावे. कारण, यापूर्वी माजी राज्यमंत्री वसुधा देशमुख व विनायक कोरडे यांनीदेखील राज्यमंत्रिपद भूषविल्यानंतर पराभवाचा सामना केला. तेच बच्चू कडू यांच्याबाबत घडले. या दुर्दैवी साम्य स्थळाची अचलपूर मतदारसंघात जोरदार चर्चा होत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटविणारे मातब्बर नेते अचलपूर मतदारसंघातून निवडून गेले. तीनदा या मतदारसंघाला राज्यमंत्रिपद भूषविण्याचा मानसुद्धा मिळाला. या मतदारसंघात सलग तीनदा आमदार कुणीही झालेले नव्हते. पण, अपक्ष असूनही चार वेळा विजय मिळविणारे बच्चू कडू यांनी अनेक विभागांचे राज्य मंत्रिपद देखील डिसेंबर 2019 ते जून 2022 या कार्यकाळात भूषविले. त्यापूर्वी स्व.विनायक कोरडे यांनी सन 1995 ते 1999, तर त्यानंतर वसुधा देशमुख यांनी सन 1999 ते 2004 पर्यंत राज्यमंत्रिपद भूषविले होते.

### विकास झाला परंतू पराभव झाला

सन 1999 ते 2004 या कार्यकाळात वसुधा देशमुख या राज्यमंत्री तसेच जिल्ह्याच्या पालकमंत्रीसुद्धा होत्या. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्रिपद भूषवताना मतदारसंघातील विविध रस्ते चकाकून टाकले. शासकीय इमारती उभ्या केल्या. शहर व ग्रामीण भागातील रस्ते मोठे झाले. दळणवळणाचे साधन वाढल्याने मतदारसंघाचा विकास झाला. मात्र, राज्यमंत्रिपद भूषिवल्यानंतर पुढच्याच निवडणुकीत त्यांचा बच्चू कडू यांनी पराभव केला.

विनायक कोरडे यांनी राज्यमंत्री असताना मतदारसंघातील अनेक तरुणांना शासकीय नोकरीत सामावून घेतले. सलग दोनदा आमदारपद भूषविलेले कोरडे यांनी मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली असल्याची नोंद आहे. तरी देखील त्यांना राज्यमंत्रिपद भूषवताच पुढच्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराकडून पराभवाचा सामना करावा लागला. या कार्यकाळात राज्यातील भाजपची सत्तादेखील ही काँग्रेस पक्षाकडे गेली.

### पहिल्यांदा दिव्यांग कल्याण मंत्रालयाची स्थापना

सलग चारदा अचलपूर मतदारसंघातून निवडणूक जिंकण्याचा विक्रम बच्चू कडू यांनी केला. अपक्ष असूनही डिसेंबर 2019 ते जून 2022 या अडीच वर्षांत त्यांनी ठाकरे मंत्रीमंडळात विविध विभागांचे राज्यमंत्रिपद भूषविले. शिंदे-फडणवीस सरकारने बच्चू कडू यांच्या पाठपुराव्याने राज्यातील पहिल्या दिव्यांग कल्याण मंत्रालयाची स्थापना केली. राज्यमंर्त्याचा दर्जा असलेले दिव्यांग मंत्रालयाचे अध्यक्षपदसुद्धा बच्चू कडू यांना मिळाले. या मंत्रालयाने अनेक दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ थेट देण्यास मोलाची भूमिका बजावली. इतकेच नव्हे, तर राज्यमंत्री असताना हजारो कोटींची विकासकामे अचलपूर मतदारसंघात बच्चू कडू यांनी आणली. मात्र, 2024 च्या निवडणुकीत त्यांना भाजपच्या उमेदवाराकडून पराभव पत्करावा लागला. राज्यमंत्रिपद भूषविलेल्या उमेदवारांना अचलपूर मतदारसंघात विविध विकासकामे केल्यानंतरही पराभवाचा सामना करावा लागत असल्याने राज्यमंत्रिपद हे अभिशाप तर नाही ना, अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

# ग्रंथदिंडीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता आदि मूल्यांचा जागर

## 23 वे राज्य स्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलन ■ भारताच्या संविधान दिनी प्रबोधन



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.28 ) –** येथील सर्वोदय शिक्षण समिती व वराड विकास अमरावतीचे वतीने 23 वे राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनाचे महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तसेच सौ. गंगाबाई सितारामजी चौधरी कन्या हायस्कूल हिवरखेड येथे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून प्रबोधन पर समता ग्रंथ दिंडी मधून स्वातंर्त्य, समता, बंधूता आधी मूल्यांचा जागर करण्यात आला. सामाजिक क्रांतीचे आद्य प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला हारार्पण व अभिवादन करून प्रबोधन पर समता ग्रंथदिंडीची सुरुवात झाली. सर्वोदय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. सा. मो. पाटील, वऱ्हाड विकास चे संपादक तथा संयोजक प्रा. श्रीकृष्ण बनसोड, माजी प्राचार्य रवींद्र उ. वासनकर , प्रा.डॉ. बी .एस. चंदनकर प्राचार्य सुनंदा दातीर, संजय टाक, वसंतराव तडस, प्रकाशराव भोजने, नारायणराव मेंढे, पत्रकार जितेंद्र फुटाणे, प्रा.सुभाष पारीसे, किशोर गहूकर, नंदा थोरात गावातील ग्राम वाचनालयाचे पदाधिकारी, साहेबराव निंभेकर सर, अनंतराव फांजे, पंकज भडके, भुषण बेलसरे यासह फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार जोपासणारे अनेक मान्यवर हजर होते.

समता ग्रंथदिंडीत महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा, मातोश्री सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अनुक्रमे रोहित बचले, ढोरे, अलकेश परतेती, आरती महेंद्र हे विद्यार्थी विशेष आकर्षण ठरले होते. भारताच्या 75 व्या संविधान दिनी 23 वे राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक साहित्य संमेलनातून सत्यशोधकीय, धर्मनिरपेक्ष व परिवर्तनाच्या विचाराला गती मिळणार असल्याचे प्रा. श्रीकृष्ण बनसोड म्हणाले महात्मा फुले लिखित सत्याचे अखंड गायनाने ग्रंथ दिंडीची सुरुवात झाली आणि गावातील मुख्य मार्गाने दिंडी चे व पालखी चे स्वागत ठिकठिकाणी करण्यात आले तसेच बौद्ध विहार येथे सुध्दा स्वागत करण्यात आले. फुले, शाहू ,आंबेडकर यांच्या विचारांच्या जयघोषाने संपूर्ण हिवरखेड नगरी दुमदुमून गेली होती . प्रत्येक घरासमोर आकर्षक रांगोळ्या ह्या मन वेधून घेत होत्या. गावात संपुर्ण स्वच्छता करण्यात आली होती.

# चिखलदरा येथे निःशुल्क रोगनिदान शिबिर

## रेडियंट सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.28 ) –** अमरावती येथील सुप्रसिद्ध हॉस्पिटल्स रेडियंट सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल्स व रिहॅबिलेशन्स सेंटर अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने मेळघाटातील आदिवासी बांधवांसाठी निशुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये विविध आजारावर निशुल्क उपचार होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने मिरगी, फिट, आकडी, अपस्मार, अपिलेप्सी, डोकेदुखी, मायग्रेन, चक्कर येणे, लकवा, पॅरालिसिस स्ट्रोक, डोक्यावर मार लागणे, मानेचे व मणक्याचे दुखणे, स्पाइन प्रॉब्लेम, ब्रेन ट्यूमर, विसरभोळेपणा अश्या विविध आजारांवर या ठिकाणी उपचार होणार आहे. दि.1 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 वाजेपर्यंत चिखलदरा येथील नगरपरिषद हॉल स्थित पहिला माळ्यावर या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराची लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.सिकंदर अडवाणी व डॉक्टर आनंद काकांनी यांनी शिबिराचे लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिराला रेडियंट हॉस्पिटलचे तज्ञ डॉ.सिकंदर अडवाणी न्यूरोलॉजिस्ट तसेच डॉ.आनंद काकानी न्यूरोसर्जन उपस्थित राहणार आहेत. या ठिकाणी या सर्व रोगावर उपचार निशुल्क करणार आहे. तसेच औषध सुद्धा निशुल्क वितरित करण्यात येणार आहे, तरी मेळघाटातील सामान्य जनतेने आदिवासी बांधवांनी या शिबिराचे लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या गरीब आदीवासींना आरोग्यविषयक सेवा देणे हे या शिबिराच्या आयोजनामागचा उद्देश असल्याचे डॉ.अडवाणी व डॉ. काकांनी यांनी सांगितले.

# सक्रीय जनसहभागाने मतदानाच्या टक्केवारीत वाढ - जिल्हाधिकारी कटियार

## स्वीपमध्ये सहभागी संस्था, संघटना, नागरिकांचा सत्कार




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 ) –** जिल्ह्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी सक्रीय सहभाग नोंदवत उत्साहात मतदान केले. याचा परिणाम म्हणून जिल्ह्याच्या मतदानाच्या टक्केवारीत सहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. मतदारांमध्ये जनजागृती आणि मतदान करण्याचा चांगल्या अनुभवामुळे या टक्केवारीत वाढ झाल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हा परिषदेत स्वीप उपक्रमांतर्गत सक्रीय सहभाग नोंदविलेल्या संस्था, संघटना, शासकीय यंत्रणा, मतदारसंघात उत्कृष्ट कार्य करणारे प्रतिनिधी, माध्यमांचे प्रतिनिधी यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सहायक जिल्हाधिकारी अमर राऊत, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार यांनी, मतदान करायला आलेल्यांना चांगला अनुभव येणे आवश्यक आहे. यासाठी प्रशासनाने मतदान केंद्र स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दिव्यांगांसाठी विशेष व्यवस्था केली. निवडणुकीचे सुनियोजन करण्यात आल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली. जनजागृती, हेल्पलाईन, सायकल रॅली अशा विविध उपक्रम ग्रामपातळी ते शहरी भागापर्यंत केल्याने नागरिकांना प्रोत्साहित केले. पोलिस, महापालिका, ग्रामपंचायत, माजी सैनिक, महिला, आशासेविका, सामाजिक संस्था, संघटना, पत्रकार यांच्या सहकार्यामुळे मतदार आणि प्रशासन यांच्यात दुहेरी संवाद झाला. प्रशासनाने केलेल्या तयारीमुळे विधानसभा निवडणुकीत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे सांगितले.

## जुगार खेळणाऱ्या 7 जणांना अटक

**अमरावती –** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवी वस्ती येथील इंदिरा नगरमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्डयावर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी सात जुगाऱ्यांना अटक केली. पोलिसांनी घटनास्थळावरून 5200 रुपयांची रोकड जप्त केली आहे. ही कारवाई 27 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 7 वाजता करण्यात आली.

# रामकृष्ण आवारे यांचे निधन

**जन्मदिवसाच्या दिवशीच घेतला अखेरचा श्वास**

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.28 )–** सिताबाई संगई हायस्कुल अंजनगाव सुर्जी येथे मुख्याध्यापक पदी निवृत्त झालेले व अंजनगाव सुर्जी तालूक्यातील अनेक विद्यार्थांचे भविष्य घडविणारे हंतोडा तालुका अंजनगाव सुर्जी येथील निवासी रामकृष्ण झामुजी आवारे यांचे बुधवारी (दि.27) वृध्दापकाळाने वयाच्या 98 व्या वर्षी अंजनगाव येथे निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले, तीन मुली, नातू, पंतू असा परिवार आहे.



हंतोडा येथे सन 1927 साली जन्मलेले 10 वीचे शिक्षण पुर्ण करुन रत्नाबाई राठी कन्या शाळा दर्यापुर येथे शिक्षक, खंडवा येथे पदविका पुर्ण करुण मंचनपुर सावरा येथे तीन वर्षे आणि नंतर अंजनगाव सुर्जी येथे सिताबाई संगई शाळेत शिक्षक व नंतर मुख्याध्यापक म्हणून सन 1987 साली सेवा निवृत्त झाले. त्यांनी आपल्या तिनही मुलांना उच्चशीक्षित करित असतांना विद्यार्थ्यांनाही घडवले. आवारे गुरुजी हे नाव आजही अंजनगाव सुर्जी तालूक्यातील मोठमोठी व्यक्ती सन्मानाने घेतात आणि आम्ही आवारे गुरुजी यांचे मुळे घडलो असे, सांगतात. विशेष म्हणजे आवारे गुरुंजीनी वाढदिवसाच्या दिवशीच म्हणजे 27 नोव्हे.ला हे जग सोडले याचे आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. अंतीम संस्कारावेळी नातवंडानी श्रध्दांजली देतांना आजोबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तेव्हा अनेकांचे डोळे अश्रुंनी डबडबले.

# जिजाऊ ब्रिगेडचे राज्य अधिवेशनाला जाणार शेकडो महिला

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.28 ) –** जिजाऊ ब्रिगेडचे सातवे राज्य अधिवेशन सांगली येथे 30 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर या दोन दिवसांमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या दोन दिवसात महिलांना विविध विषयांवरील कार्यक्रमांची मेजवानी मिळणार असून या अधिवेशनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो महिला उपस्थित राहणार आहे. 30 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 5 वाजता वारणा-कृष्णा नद्यांच्या संगमावरून भव्य शोभायात्रा निघणार असून रात्री 8 वाजता





सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमा बोके यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या अधिवेशनाचे उद्घाटन सरसेनापती संताजी घोरपडे यांच्या वंशज डॉ.अश्विनी घोरपडे, पुणे यांच्या हस्ते 1 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजता होणार आहे. या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्ष स्वप्नाली विश्वजीत कदम असून राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी या ठिकाणी उपस्थित राहणार आहे.

या अधिवेशनात सामाजिक, बौद्धिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक यासारख्या अनेक विषयांवर परिसंवाद आयोजित केले असून त्या माध्यमातून महिलांचे प्रबोधन केले जाणार आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातून शेकडो महिला उपस्थित राहणार असून सांगली जिल्हाध्यक्ष प्रणिता पवार यांच्या मार्गदर्शनात अधिवेशनाची जयत तयारी सुरू असून विविध समित्यांचे गठन केले आहे. सांगलीच्या हरिपूर येथील भव्य रॉयल पॅलेस मध्ये हे अधिवेशन पार पडणार असून मराठा सेवा संघाचे संस्थापक ?ड.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या उपस्थितीत या अधिवेशनाचा समारोप होणार आहे. या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.विजय घोगरे, जिजाऊ ब्रिगेडच्या महासचिव स्नेहा खेडेकर, संपूर्ण प्रदेश कार्यकारणी, महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष व हजारो महिला उपस्थित राहणार आहे. तरी जास्तीत जास्त महिलांनी या अधिवेशनाचा लाभ घ्यावा असे आवाहन अमरावती अमरावती जिल्हाध्यक्ष हर्षा ढोक व डॉ. अंजली जवंजाळ यांनी केले आहे.

# दोन महिन्यातच कॉँक्रीट मार्गाला गेले तडे


## गावकऱ्यांनी केली उच्चस्तरीय चौकशी ची मागणी




**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.28 )–** येथून जवळच असलेल्या ग्रामपंचायत गौरखेडा कुंभी अंतर्गत धारणी मार्गावर हनुमान मंदिर ते खोज कार्यालयापर्यंत सिमेंट कॉँक्रीट रस्ता बांधकाम करण्यात आला. परंतू दोन महिन्यांपूर्वीच झालेल्या या कामाला तडे गेल्याने या मार्गाच्या निर्माण कार्यावर प्रश्नचिन्ह उभे झाले आहे. या निकृष्ट बांधकामाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी गावकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

सिमेंट कॉँक्रीट मार्गाचे निर्माणकार्य सुरु आहे, त्या ठिकाणी हे निर्माणकार्य कोणत्या निधीमधून केले जात आहे, याची माहिती देणारे फलक तेथे लावण्यात आलेले नाही. त्यामूळे हे निकृष्ट काम नेमके आमदार निधीतून आहे की, खासदार निधीतून हे अजून स्पष्ट झाले नाही. मार्गाचे बांधकाम झाले तेव्हा पासून त्यावर पांढ्या रंगाची सिमेंट सारखी बारीक पावडर धुळीसारखी उडत आहे. ही सिमेंटसारखी पावडर दूचाकीवर ये-जा करणाऱ्या लोकांच्या डोळ्यात गेल्याने अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. रस्त्याया दोन्ही बाजूला हातभर खोल साईड पट्टी रिकामी सोडलेल्या अवस्थेत आहे. आजपर्यंत मुरूम टाकून बुजविण्यात आली नाही. हा प्रकारही अपघाताला आमंत्रण देणारा आहे. आता रस्त्याच्या मधोमध कमीतकमी सहा इंच रूंद भेग पडल्याने हा मार्ग अल्पायुषी ठरतो की, काय असे वाटायला लागले आहे. ग्रामपंचायत



कार्यालय गौरखेडा कुंभी येथील ग्रामपंचायत अधिकारी व पदाधिकारी या कामाकडे दुर्लक्ष करित आहेत. या संपूर्ण कामाची गुणवत्ता तपासणी होवून याप्रकरणी उच्चस्तरीय समितीकडून तपास करण्याची मागणी केली जात आहे.

**नगरपंचायत कार्यालय, भातकुली जि. अमरावती**
**( जैन मंदिर परिसर, भातकुली )**

दुरध्वनी ०७२१-२३८९०९० ई-मेल.npbhatkuli@gmail.com
जावक क्र. ६७३/२०२४ दिनांक २८/११/२०२४

**जाहीर सुचना/आवाहन**
**( बांधकाम विभाग )**

भातकुली शहरातील सर्व नागरीकांना कळविण्यांत येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रस्त्यावरील खड्या संदर्भात जनहित याचिका 71/2013 दाखल झालेली आहे. त्याअनुषंगाने भातकुली नगर पंचायत क्षेत्रातील रस्त्यांवरील खड्या संदभांत तक्रार नोंदविणेकामी नागरीकांसाठी खालील नमूद केलेप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन दिलेले आहेत. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

1) IWBP Website Portal Link- https://mahaulb.in/ MahaULB/citizenservicepage

2) Ph (0721) 2389090

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत, भातकुली